# उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती यांचे कार्यालय


जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कॅम्प, अमरावती-४४४६०२

दुरध्वनी क्रमांक :- ०७२१ - २५५०७१२, ई-मेल :- dyslramravati@gmail.com


क्र./न.भू./ न.प.भु.-३/ बी सत्ता. अहवाल/ २०१९
अमरावती, दिनांक:-१८/१२/२०१९

आवक ७०३५-९

प्रति,

मा. प्राचार्य,
श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय
अमरावती.

विषय:- मौजा अमरावती येथील नझुल शिट क्र. ३२, प्लॉट न. ७/३ संबधीत आखिव पत्रिकेवर कोणताही बोझा नसल्याचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत।

संदर्भ :- आपल्या कडील पत्र जा. क्र. /९९/ बी. एड /२०१९, अमरावती, दि. ०७/१२/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार अहवाल सादर करणेत येते की, आपल्या कडील संदर्भिय पत्र अन्वये श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांचे ताब्यात असुन हया मालमत्तेवर संस्थेने कुठल्याही प्रकारचे वित्तीय कर्ज घेतलेले नाही व आखिव पत्रिकेला बोझा नसल्याचे प्रमाणपत्राची मागणी केला आहे. त्या अनुषंगाने सदर मिळकतपत्रिकेचे अवलोकन केले असता मौजा शहर अमरावती, शिट क्र. ३२, प्लॉट न. ७/३, सत्ताप्रकार बी १, क्षेत्र ४०९०.७ चौ. मी., असुन मुळ धारक सदरी सरकार व इतर भार सदरी शिवाजी शिक्षण संस्थेला दिली अशी नोंद दर्ज आहे. इकडील कार्यालया मार्फत प्रमाणपत्र दिल्या जात नाही तर आखिव पत्रिकेची नक्कल शासकीय फीचा भरणा करुन पुरविण्यात येते.

सदर आखिव पत्रिकेचे अवलोकन केले असता सदर मिळकत आज रोजी गहाण ठेवल्याची नोंद आढळुण येते नाही. शिट क्र. ३२, प्लॉट न. ७/३, या मिळकतीवर शिवाजी शिक्षण विद्यालय, अमरावती यांची इमारत आहे. करीता माहितीस सादर

(स्वाक्षरी) १८/१२

उप अधीक्षक भूमि अभिलेख,
अमरावती.